आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक-29.08.2026 वार- शनिवार

ऑलिम्पिक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घेण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून, २०३६ च्या ऑलिम्पिकमध्ये भारताचा सहभाग आणि पदकांची संख्या वाढवण्यासाठी लहान वयापासूनच क्रीडा प्रतिभा शोधण्याची गरज केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली.
राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पुण्यात आयोजित विशेष टपाल आवरणाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ या विषयावर हे विशेष आवरण प्रकाशित करण्यात आलं आहे.

पोषण आहार

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि पौष्टिक आहार मिळावा, याकरता उपलब्ध साठा आणि प्रत्यक्ष गरज यांचा विचार करूनच शाळांनी तांदूळ आणि अन्यधान्याची मागणी नोंदवावी, असे स्पष्ट निर्देश पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने दिले आहेत. अनावश्यक धान्यसाठा टाळण्यासोबतच उपलब्ध धान्याची गुणवत्ता, योग्य साठवणूक आणि अन्न सुरक्षा नियमांचं पालन यांची काटेकोर तपासणी यापुढे केली जाणार आहे.

बार्टी

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू आहे. मात्र, जात वैधता प्रमाणपत्राशी संबंधित त्रुटींची पूर्तता न केलेल्या विद्यार्थ्यांमुळे प्रवेश प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊ नंयेत याकरता पुण्यातल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), ने आपली कार्यालये सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

परीक्षा मूल्यमापन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना आता पदवीदान समारंभाआधीच पदवी प्रमाणपत्राची ऑनलाइन पडताळणी करता येणार आहे. प्रमाणपत्रातील नाव किंवा अन्य तपशिलात काही चूक आढळल्यास ती दुरुस्त करून घेण्याची सुविधा विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन विभागाने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे दुरुस्तीसाठीचे हेलपाटे आणि प्रवास खर्च वाचणार आहे. विद्यापीठाच्या १२७व्या पदवीप्रदान समारंभाची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

भटके-विमुक्तदिवस

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सोमवारी ३१ ऑगस्ट रोजी 'भटके-विमुक्त दिवस' साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त पिंपरी मधल्या भाटनगर, लिंक रोड, इथे परिसंवाद, आरोग्य शिबिर आणि भटके-विमुक्त समाजाच्या लोकसंस्कृतीचं दर्शन घडविणाऱ्या विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

उसाला

वाढता उत्पादन खर्च आणि उसाला मिळणारा अपुरा दर यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. उसाला किमान ४,५०० रुपये प्रतिटन दर मिळावा, या मागणीसाठी पुण्यात शेतकऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत योग्य दर निश्चित होईपर्यंत

ऊसतोड बंद ठेवण्याचा आणि गुऱ्हाळांमध्येही ऊस न घालण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. सध्या परिसरातील शेतकऱ्यांना उसासाठी पस्तीसशे ते छत्तीसशे रुपये प्रतिटन दर मिळत आहे.

शिक्षकभरती

राज्य सरकारने पवित्र पोर्टलद्वारे नुकत्याच केलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेमधून पुणे जिल्हा परिषदेला ४३६ शिक्षक मिळाले आहेत. यामुळे आतापर्यंत शिक्षक नसलेल्या शाळांपैकी काही जिल्हा परिषद शाळांना आता कायमस्वरूपी शिक्षक मिळणार असल्याचं पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीनं कळवलं आहे .
प्राथमिक शिक्षक भरती प्रक्रियेचा हा पहिला टप्पा असून ऑक्टोबरमध्ये दुसरा टप्पा पूर्ण होईल.

गौरव

पुण्यात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त महाराष्ट्रातील हॉकी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मुरली अग्निस्वर, राजेंद्र जोशी, सलामत इराणी, फेलिक्स बर्नार्ड आणि मेघराज मूर्ती यांना राष्ट्रीय क्रीडा दिन पुरस्कार २०२६ देऊन गौरवण्यात आलं. म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या कार्यक्रमात क्रीडा आयुक्तांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.
या वेळी क्रीडा आणि हॉकी इंडियाचे पदाधिकारी तसंच ऑलिम्पिकपटू अजित लाक्रा आणि विक्रम पिल्ले उपस्थित होते.

पाऊस

पुणे विभागात ऑगस्ट महिन्यात पावसाचं प्रमाण कमी राहिलं. आजच्या आकडेवारीनुसार, विभागात जूनपासून आतापर्यंत सरासरीच्या ७७ टक्के इतका पाऊस झाला आहे. मात्र सरासरीच्या ५२ टक्के इतक्या पावसाची नोंद ऑगस्ट महिन्यात झाली असून जिल्हानिहाय पावसाची स्थिती असमान आहे.

निधन

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी पूर्णवेळ कार्यकर्ते डॉ श्रीपाद मथुराकांत ढेकणे यांचं आज पुण्यात निधन झालं. ते ६१ वर्षांचे होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या महाराष्ट्राच्या सुकाणू समितीचे ते सदस्य होते. त्यांच्या पार्थिवावर रात्री साडेआठ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

हवामान

पुणे आणि परिसरात काही ठिकाणी अधून मधून पावसाच्या सरी पडत होत्या. उद्या तुरळक ते जोरदार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.